## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

## श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद. जिल्हा यवतमाळ.

## NSS वार्षिक अहवाल- 2021−22

**उपविभागीय अधिकारी मा. सावन कुमार यांनी शिबिरास भेट दिली..**





**महाविद्यालयाचे प्राचार्य मा. गणेश पाटील, मा श्री. पी झेड. राठोड यांचे स्वागत करताना**



### श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयामध्ये कोविड–१९ लसीकरण शिबीर संपन्न

**पुसद (का.प्र)** श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला व उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. २८ ऑक्टोबर २०२१ रोजी कोविड–१९ लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी पी.झेड.राठोड (तालुका आरोग्य विस्तारक पुसद) यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांचे स्वागत प्रा. डॉ. रजनी भोयर यांनी केले. प्रिती गणवीर यांचे स्वागत प्रा. डॉ. छाया जतकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अंजली पांडे यांनी केले. पुसद येथील उपविभागीय अधिकारी सावन कुमार यांनी या शिबिरास सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत प्रा. डॉ. असीम खापरे व महाविद्यालयाचे अधीक्षक पंजाब राठोड यांनी पुष्पगुच्छे देवून केले. त्यांनी विद्यार्थीनींना राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे यासाठी प्रोत्साहन दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. या शिबिरात ८६ विद्यार्थिनींना लसीकरणाचा लाभ झाला. या शिबिराचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.असीम खापरे यांनी केले. प्रा.डॉ.अंजली पांडे, प्रा.विरेंद्र शिंदे, व प्रा. डॉ.प्रेम राठोड (समन्वयक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ) यांचे सहकार्य लाभले. कु.प्रिती गणवीर, पुजा पवार, आशा वर्कर सौ.प्रियंका चोपडे, वर्षा ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. एनएसएस च्या स्वयंसेविका श्रद्धा सुरोशे, वैष्णवी भालेराव, मानसी व्यवहारे वेदांगी राठोड, मृणाल मुळे, शुभांगी कोरडे, पल्लवी केळकर, पायल उबाळे अंजली चव्हाण, तेजस्वीनी तायडे, आरती गोरे, तनुजा खंदारे या विद्यार्थीनी शिबिरात सहभागी झाल्या होत्या. यावेळी प्रा.डॉ.विरेंद्र शिंदे, प्रा. डॉ. साधना मोहोड, प्रा.डॉ.अरुण पवार, प्रा. सरिता चापके, प्रा. सुपे, प्रा.डॉ. अमित सुरजुशे इ. उपस्थित होते.

25 जाने.2021 राष्ट्रीय मतदार दिवस, मतदार प्रतिज्ञा घेऊन साजरा करण्यात आला...






### श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस

**पुसद(का. प्र.):** श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गणेश पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पुजन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. असीम खापरे यांनी केले.

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मतदारांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. मतदानाचा हक्क समाजामध्ये क्रांतीकारी बदल घडवून आणु शकतो हे सांगुन उपस्थित प्राध्यापकवर्ग व विद्यार्थिनींना मतदारांची प्रतिज्ञा दिली गेली. कु. श्रध्दा सुरोशे हिने एनएसएसचे लक्ष्य गीत गायीले. प्राचार्य डॉ. गणेश पाटील कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना म्हणाले, नागरिकांना मिळालेला मतदानाचा हक्क हा कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे बजावला पाहिजे. कु. तेजस्विनी तायडे हिने मतदार राजा जागा हो–लोकशाहीचा धागा हो ही कविता सादर केली. कु. प्रियंका मोदीराज हिने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे करण्यात आले. व्यासपीठावर प्रा. डॉ. अंजली पांडे व विरेंद्र शिंदे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनी व महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.






# महिला महाविद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

पुसद(का. प्र.)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात रासेयो विभागाद्वारे संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. चंद्रकिरण घाटे होते. प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. अंजली पांडे होत्या. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. असीम खापरे व प्रा. विरेंद्र शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्रीमती वत्सलाबाई नाईक व संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले. कु. श्रध्दा सुरोशे हिने विद्यापीठ गीत गायीले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. असीम खापरे यांनी केले. प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. अंजली पांडे आपले विचार व्यक्त करतांना म्हणाल्या, गाडगेबाबा यांनी मानवा मध्ये देव पाहण्याचा व वैज्ञानिक दृष्टिकोन किर्तनाच्या माध्यमातून समाजा पर्यंत पोहचवला तर प्रा. विरेंद्र शिंदे यांनी संत गाडगे बाबा यांचे विचार पर्यावरण रक्षणासाठी आजही उपयुक्त आहे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. चंद्रकिरण घाटे म्हणाले की, संत गाडगे बाबा हे चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांनी आपल्या जीवनाचा समाजा पुढे नव आदर्श निर्माण केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. श्रध्दा सुरोशे हिने केले तर संचलन कु. मृणाल मुळे हिने केले. कार्यक्रमाची सांगता खरा तोची धर्म जगाला प्रेम अर्पावे या गीताने झाली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील स्टाफ व विद्यार्थिनींनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. डॉ. असीम खापरे यांनी केले.

## ग्रामीण पोलीस स्टेशन पुसद वृक्षारोपण करताना... NSS च्या विद्यार्थिनी






## NSS कॅम्प इंदिरानगर







OPPO F19
2022/03/10 12:07 Yavatmal, Maharashtra